B.Com / B.Sc. / B.Sc. (I.T.) / B.C.A. (Sci.) (CBCS)-Regular-Semester 2017 Sem I

**UCA1F01 / UCA1F01 / UBITT102.2 / UBCAT102.2**

**Compulsory Marathi-I - आवश्यक मराठी**

P. Pages : 2 **GUG/S/18/10094S**

Time : Three Hours Max. Marks : 80

---

1. लोकशाहीच्या यशस्वितेकरीता आणि लोकशाही टिकविण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी कोणते उपाय सुचविले आहेत? **15**

**किंवा**

' माणूस ' या पाठातून उत्तम कांबळे यांनी माणुसकीचे दर्शन कसे घडविले आहे ते सविस्तर स्पष्ट करा.

2. 'विद्यार्थ्यांप्रत' या कवितेतून केशवसुतांनी विद्यार्थ्यांमधील श्रेष्ठ गुणांचे वर्णन कसे केले आहे ते सांगा. **15**

**किंवा**

' स्वप्नाची समाप्ती' या कवितेचे रसग्रहण करा.

3. पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दांत लिहा. **15**

**गट-'अ'**

क) आपल्या मुलाबाळांना शिक्षण द्या असे गाडगेबाबा का म्हणतात ?

ख) युरोपमध्ये न्यूटन झाला तसा भारतात एकही शास्त्रज्ञ जन्माला का आला नाही ?

ग) म्हशीच्या मालकाने लेखकाच्या वडिलांना का मारले ?

**किंवा**

**गट-'ब'**

च) 'सर्वसामान्य जनतेला विज्ञानाच्या बदलत्या काळाची चाहूल लागली पाहिजे ' असे जयंत नारळीकर का म्हणतात?

छ) गाडगेबाबांच्या मते, मनुष्य देव कसा होतो?

ज) मालनबाईने कचरू गिऱ्हे यांना त्यांच्या बालपणी कशी मदत केली?

4. पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दांत लिहा. **15**

**गट -'क'**

त) ज्ञानेश्वरांनी पसायदानात संतांचा महिमा कसा वर्णन केला आहे?

थ) कवयित्री उषाकिरण आत्राम कार्यकर्त्यांना कोणते आवाहन करीत आहे?

द)    'भावनेला येउं दे गा शास्त्र -काटयाची कसोटी' असे कवी का म्हणतात?

**किंवा**

**गट-'ड'**

प)    'लेखनीच्या तलवारीने वार करणे शिका !' असे कवयित्री कोणाला उद्देशून व का म्हणते?

फ)    ' वाकुं दे बुध्दीस माझ्या तप्त पोलादाप्रमाणे ' असे मागणे कवी का मागतो?

ब)    ज्ञानेश्वरांनी विश्वात्मक देवाला पसायदान का मागितले?

**5.**    अः    पुढीलपैकी **कोणत्याही एकाच** गटातील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी सुमारे शंभर शब्दात लिहा.    **10**

**गट- 'च'**

1)    वाचनाचे प्रकार सांगून त्याचे महत्व स्पष्ट करा.

2)    भाषणात किंवा बोलण्यात उच्चारणाला कसे महत्व असते ते सांगा.

**किंवा**

**गट-'छ'**

3)    भाषिक कौशल्य कोणती आहेत ते स्पष्ट करा.

4)    भाषण देताना समृध्द शब्दसंग्रहाची गरज का असते?

बः    पुढीलपैकी **कोणतेही पाच** प्रश्न सोडवा. गुण प्रत्येकी -2    **10**

1)    भाषेचे महत्व थोडक्यात स्पष्ट करा.

2)    व्याकरण म्हणजे काय?

3)    मराठीतील वर्णविचार स्पष्ट करा.

4)    ऱ्हस्व स्वर व दीर्घस्वर यातील फरक स्पष्ट करा.

5)    स्वरादी म्हणजे काय?

6)    अनुनासिक वर्ण कोणकोणते आहेत?

7)    उष्मे किंवा घर्षक कशाला म्हणतात?

*********************